blue

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## विद्वत परिषद बैठक

## कार्यवृत्त

**बैठक क्रमांक** : 60

**स्थळ** : यश इन सभागृह
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
नाशिक, 422222

**दिनांक** : गुरूवार, दि. 23 फेब्रुवारी 2023

**वेळ** : दुपारी 3.00 वाजता

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## (महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विद्वत परिषद 60 वी बैठक गुरूवार, दि. 23 फेब्रुवारी 2023 रोजी दुपारी 3.00 वा. यश इन सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 01. | प्रा. डॉ. पी.जी.पाटील, कुलगुरु | अध्यक्ष |
| 02. | डॉ.जयदीप निकम, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा व प्रभारी संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| 03. | डॉ. प्रमोद बियाणी, संचालक, शैक्षणिक सेवा विभाग | सदस्य |
| 04. | डॉ. प्रविण घोडेस्वार , प्रभारी संचालक, मानव्यविद्या व सा.शास्त्रे विद्याशाखा | सदस्य |
| 05. | डॉ. सुरेंद्र पाटोळे, प्रभारी संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| 06. | डॉ. माधुरी सोनवणे, प्रभारी संचालक, कृषी विज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| 07. | डॉ. सुनंदामोरे, प्रभारी संचालक, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| 08. | डॉ.कविता साळुंके, प्रभारी संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा | सदस्य |
| 09. | श्री. माधव पळशीकर, प्रभारी संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा | सदस्य |
| 10. | डॉ.प्रकाश देशमुख, प्रभारी संचालक, विद्यार्थी सेवा विभाग | सदस्य |
| 11. | डॉ.सज्जन थुल, प्रभारी संचालक , मूल्यमापन विभाग | सदस्य |
| 12. | डॉ. मधुकर शेवाळे, उपग्रंथपाल, ग्रंथालय व माहितीस्त्रोत केंद्र | सदस्य |
| 13. | श्री. भटूप्रसाद पाटील, कुलसचिव, व परीक्षा नियंत्रक | सदस्य सचिव |
| 14. | डॉ.राम ठाकर, संचालक, अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कक्ष | निमंत्रित |

| क्र. | ठराव क्र. | तपशिल |
|---|---|---|
| 60.1.0 | | **स्वागत** — मा.कुलसचिवांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. |
| 60..2.0 | 60.2.1 | दि. 31 मे 2021 रोजी झालेल्या 59 व्या विद्वत परिषदेच्या बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे<br>**विद्वत परिषद ठराव** - दि. 31 मे 2021 रोजी झालेल्या 59 व्या विद्वत परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला. |
| | 60..2.2 | दि. 31 मे 2021 रोजी झालेल्या 59 व्या विद्वत परिषदेच्या बैठकीतील निर्णयावरील कार्यवाहीचाअहवाल<br>**विद्वत परिषद ठराव** - दि. 31 मे 2021 रोजी झालेल्या 59 व्या विद्वत परिषदेच्या बैठकीत झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| 60.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 60.3.1<br>अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कक्ष | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – 2020 अंतर्गत शिक्षकांच्या शैक्षणिक कालावधीतील कार्याचे मूल्यमापन शिफारसीच्या अहवालाची अंमलबजावणी करणेबाबतचा प्रस्ताव चर्चेसाठी व विद्वत परिषद निर्णयार्थ सादर<br><br>**टिपणी** – राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – 2020 ची अंमलबजावणी करणेबाबत शासनाने डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. सदर समितीने अहवाल सादर केला आहे. सदर अहवालातील शिफारशी शासनाने स्विकारल्या असून या शिफारशींची विहित प्राधिकरणांची मान्यता घेऊन, तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत विद्यापीठांना निर्णय घेण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार सदरचा विषय विद्वत परिषद निर्णयार्थ सादर....<br><br>**विद्वत परिषद ठराव** - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – 2020 अंतर्गत शिक्षकांच्या शैक्षणिक कालावधीतील कार्याचे मूल्यमापन शिफारसीच्या अहवालाची अंमलबजावणी करणेबाबत डॉ. जयदीप निकम, संचालक निरंतर शिक्षण विद्याशाखा यांच्या अध्यक्षतेखाली पाच प्राध्यापकांची समिती गठित केली आहे. सदर समितीचा अहवाल पुढच्या विद्वत परिषदेत सादर करण्याचे ठरले. |
| | 60.3.2<br>परीक्षा नियंत्रक | श्रीमती प्रतिभा प्रलहाद पवार (बी.एड. तुकडी 2002-2004) या विद्यार्थीनीच्या प्रवेशातील त्रुटीमुळे निकाल रद्द् करणे किंवा कसे याबाबतचा परीक्षा मंडळ सभा दि. 3 ऑगस्ट 2021 ठराव क्र. 39.04.04 विद्वत परिषद निर्णयार्थ सादर...<br><br>**टिपणी**- श्रीमती प्रतिभा प्रल्हाद पवार (बी.एड.तुकडी 2002-2004) विद्यार्थीनीच्या प्रवेशातील त्रुटीमुळे निकाल रद्द करणे किंवा कसे याबाबतचा परीक्षा मंडळ सभा दि. 3 ऑगस्ट 2021 ठराव क्र 39.04.04 अन्वये विषय ठेवण्यात आलेला होता. श्रीमती पवार यांनी बी.एड.अभ्यासक्रमासाठी 2002-2004च्या तुकडीला आवश्यक असणारे सर्व कागदपत्रे तत्कालीन प्रवेश समितीने तपासून प्रवेश निश्चित केला होता. या निकालाच्या आधारे संबंधीत विद्यार्थीनीने परीक्षाही दिलेली आहे. यासंदर्भात परीक्षामंडळाने झालेला कालापव्यय पाहता निकाल रद्द करु नये याबाबत विचारार्थ व निर्णयार्थ विद्वत परिषदेत व व्यस्थापन मंडळाच्या बैठकीत सादर करावा असे ठरले.सोबत परीक्षा मंडळ सभा दि. 3 ऑगस्ट 2021 ठराव क्र 39.4.4 जोडला आहे. सदरचा विषय विद्वत परिषदेसमोर निर्णयार्थ सादर<br><br>**विद्वत परिषद ठराव** - परीक्षा मंडळ सभा दि. 3 ऑगस्ट 2021 ठराव क्र 39.4.4 अन्वये केलेल्या शिफारसीवर विचार विनिमय होवून परीक्षा मंडळाने केलेली शिफारस मा. व्यवस्थापन मंडळाकडे विचारार्थ सादर करावी असे सर्वानुमते ठरले. |

| | | |
|---|---|---|
| | 60.3.3<br>भांडार व वितरण कक्ष | नव्याने विकसित होणाऱ्या शिक्षणक्रमांची पुस्तके सॉफ्ट कॉपी/ई-बुक्स स्वरूपात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करणेबाबतचा प्रस्ताव विद्वत परिषद निर्णयार्थ सादर...<br>**टिपणी** – विद्यापीठाच्या विविध विद्याशाखेमार्फत नव्याने शिक्षणक्रम विकसित केले जातात. अशा नव्याने सुरू होणाऱ्या शिक्षणक्रमांकरिता प्रवेशार्थी विद्यार्थी संख्या अनिश्चित असते. या विद्यार्थ्यांना वेळेत पुस्तके मिळण्याच्या दृष्टीकोनातून अशा नव्याने विकसित केलेल्या शिक्षणक्रमांच्या संबंधित अभ्यासक्रमाची पुस्तके सॉफ्ट कॉपी/ई-बुक्स मध्ये विद्यापीठाच्या संकेतस्थळावर संबंधित विद्याशाखेमार्फत विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणेबाबतचा विषय विद्वत परिषद निर्णयार्थ सादर<br>**विद्वत परिषद ठराव** – अध्ययन साहित्य तयार झाल्याशिवाय शिक्षणक्रम सुरू करू नये. पुस्तकांची सॉफ्ट कॉपी विद्यापीठ पोर्टलवर उपलब्ध करून विद्यार्थ्यांसाठी पर्यायी व्यवस्था करण्यात यावी. बी.सी.ए. शिक्षणक्रमाच्या पुस्तकांची छपाई करण्यात यावी. तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने अध्ययन साहित्य 100% तयार होवू शकत नसेल अशा वेळी मा. कुलगुरू यांच्या मान्यतेने Soft Copy मध्ये अध्ययन साहित्य उपलब्ध करून देणेसंदर्भात निर्णय घेण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. |
| | 60.3.4<br>विद्यार्थी सेवा विभाग | मा.संचालक, सेंटर फॉर इंटरनल क्वालिटी अशुरन्स यांचेकडून प्राप्त झालेल्या पत्राबाबत विषय विद्वत परिषदेसमोर निर्णयार्थ सादर..<br>**टिपणी** - मा.संचालक, सेंटर फॉर इंटरनल क्वालिटी अशुरन्स यांचेकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार – युजीसीचे पत्र क्र. 21-11/2022(DEB-11) दि. 5.4.2022 नुसार कनिष्ठ महाविद्यालय व तसेच खाजगी संस्थांमध्ये असलेले अभ्यासकेंद्र बंद करणेबाबतचा विषय विद्वत परिषदसमोर निर्णयार्थ सादर....<br>**विद्वत परिषद ठराव** – व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. 184.5.3 नुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली आहे. |
| | 60.3.5<br>परीक्षा नियंत्रक | डॉ. गवळी बाळू एकनाथराव यांच्या पीएच.डी. विषय - विषय संप्रेषण (समाजशास्त्र) ऐवजी पीएच.डी. विषय–विषय संप्रेषण (समाजकार्य) असा बदल करून मिळणेबाबत..<br>**टिपणी**–डॉ. गवळी बाळू एकनाथराव या विद्यार्थ्याने 2006-07या वर्षी पीएच.डी. शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेतला होता.त्यांच्या दि.12.1.2022 च्या विनंती अर्जानुसार त्यांनी विषय संप्रेषण (समाजकार्य) या क्षेत्रामध्ये पीएच.डी.केली असून त्यांना प्रदान झालेल्या प्रमाणपत्रामध्ये विषय संप्रेषण (समाजशास्त्र) या विषयामधील पदवी प्रमाणपत्र देण्यात आले आहे.<br>संबंधीत विद्यार्थ्याला पीएच.डी. चा विषय विषय संप्रेषण (समाजशास्त्र) ऐवजी पीएच.डी. विषय संप्रेषण (समाजकार्य) बदलून देणेबाबतचा विषय विद्वत परिषदेसमोर निर्णयार्थ सादर<br>**विद्वत परिषद ठराव** – मानव्यविद्या व सामाजिकशास्त्र विद्याशाखेच्या विद्याशाखा परिषदेने यासंदर्भात समिती गठित केलेली असून या समितीच्या शिफारसी विद्वत परिषदेसमोर सादर कराव्यात असे ठरले. |

| | | |
|---|---|---|
| | 60.3.6<br>संगणकशास्त्र विद्याशाखा | नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रस्तावित केलेल्या आराखड्याप्रमाणे सर्व पदवी शिक्षणक्रम 4 वर्षे कालावधीचे करत असतानाच त्यासाठी आवश्यक असणारे अध्ययन साहित्यही विद्यापीठास तयार करावे लागणार आहे. त्यासाठी लागणारा वेळ लक्षात घेता 2024-25 या शैक्षणिक वर्षापासून पूर्ण तयारीनिशी चार वर्षीय पदवी शिक्षणक्रम राबवावेत. शैक्षणिक वर्ष 2023-24 साठी सध्या सुरू असलेले 3 वर्ष कालावधीचे शिक्षणक्रमच राबविण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठपुरावा करून त्यासाठी एक वर्ष मान्यता वाढवून मिळण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत विद्वत परिषदेच्या निर्णयार्थ सादर...<br><br>**टिपणी :** नवीन शैक्षणिक धोरणानुसार चार वर्ष कालावधीच्या संरचनेत पदवी शिक्षणक्रम आणण्यासाठी आणि जे उद्देश साध्य करण्याचा या शैक्षणिक धोरणाचा प्रयत्न आहे त्या उद्देशांना गाठण्यासाठी करावे लागणारे प्रयत्न मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणप्रणालीत अभ्यासकेंद्रांच्या मदतीने करावे लागणार आहेत. केवळ कागदावर चार वर्षांच्या संरचनेत शिक्षणक्रम बसविणे शक्य होईल मात्र ते अभ्यासकेंद्रांच्या मदतीने राबविण्यासाठी कार्यपद्धती ठरविणे आणि त्यासाठी आवश्यक यंत्रणा तयार करणे हे फार मोठे काम आहे. त्यासाठी सध्या आपण राबवित असलेल्या कार्यपद्धतीत मोठे बदल करावे लागण्याची शक्यता आहे. सध्याची अभ्यासकेंद्रांची संकल्पना बदलावी लागेल. अभ्यासकेंद्रांची पुनर्रचना करावी लागेल. हे सगळे करताना विचारपूर्वक आणि सर्व बाबी लक्षात घेऊन नवीन रचना करावी लागेल. हे करण्यासाठी किमान एक वर्ष तरी लागेल.त्यामुळे 2023-24 मध्ये नवीन संरचनेतील चार वर्षाचे पदवी शिक्षणक्रम राबविण्याऐवजी पूर्ण तयारीनिशी साठी 2024-25 या शैक्षणिक वर्षापासून त्याची अंमलबजावणी करावी.<br><br>**विद्वत परिषद ठराव** — सदर विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आला. |
| | 60.3.7<br>विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | वास्तुकला, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या दि. 11 डिसेंबर 2021 व 12 एप्रिल 2022 रोजी झालेल्या विद्याशाखा परिषद बैठकीचे इतिवृत्त विद्वत परिषदेत मान्यतेसाठी सादर..<br>**टिपणी** — दि.11 डिसेंबर 2021 व 12 एप्रिल 2022 रोजी झालेल्या वास्तुकला, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा परिषद बैठकीचे इतिवृत्त विद्वत परिषदेच्या निर्णयार्थ सादर<br><br>**विद्वत परिषद ठराव** - वास्तुकला, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा परिषदेच्या ठरावाची नोंद घेऊन, सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 60.3.8<br>वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील दि. 12 ऑगस्ट 2022 च्या विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त विद्वत परिषदेत मान्यतेसाठी सादर....<br>**टिपणी** — दि. 12 ऑगस्ट 2022 रोजी झालेल्या वाणिज्य् व व्यवस्थापन विद्याशाखा परिषद बैठकीचे इतिवृत्त विद्वत परिषदेच्या निर्णयार्थ सादर<br>**विद्वत परिषद ठराव** - वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा परिषदेच्या ठरावाची नोंद घेऊन, सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | 60.3.9<br>आरोग्य विज्ञान विद्याशाखा | आरोग्य विज्ञान विद्याशाखेतील दि. 17 ऑक्टोबर 2022 च्या विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त विद्वत परिषदेत मान्यतेसाठी सादर...<br>**टिपणी** - दि. 17 ऑक्टोबर 2022 आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त विद्वत परिषदेत मान्यतेसाठी सादर<br>**विद्वत परिषद ठराव** - आरोग्य विज्ञान विद्याशाखा परिषदेच्या ठरावाची नोंद घेऊन, सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 60.3.10<br>मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा | मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील दि. 26 नोव्हेंबर 2022 च्या विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त विद्वत परिषदेत मान्यतेसाठी सादर...<br>**टिपणी** - दि. 26 नोव्हेंबर 2022 मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त विद्वत परिषदेत मान्यतेसाठी सादर<br>**विद्वत परिषद ठराव** - मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा परिषदेच्या ठरावाची नोंद घेऊन, सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 60.3.11<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा | शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील दि. 12 डिसेंबर 2022 च्या विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त विद्वत परिषदेत मान्यतेसाठी सादर...<br>**टिपणी** - दि. 12 डिसेंबर 2022 शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त विद्वत परिषदेत मान्यतेसाठी सादर<br>**विद्वत परिषद ठराव** - शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेच्या ठरावाची नोंद घेऊन, सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 60.3.12<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा | शैक्षणिक वर्ष 2021-22 मधील शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील शिक्षणक्रमांच्या परीक्षा बदललेल्या पॅटर्न प्रमाणे घेण्याचा विद्वत परिषदेच्या निर्णयार्थ सादर<br>**टिपणी** – विद्यापीठ अनुदान आयोग आणि महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशानुसार विविध शिक्षणक्रमाच्या परीक्षा ह्या कोविड 2019 च्या प्रादभावामुळे 2020-21 पासून ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येत आहेत. मा.कुलगुरु आणि परीक्षा नियंत्रक ह्यांच्या झालेल्या चर्चेनुसार प्रश्नपत्रिकेचा पॅटर्नमध्ये बदल सुचविण्यात आला आहे. पुर्वी 50 प्रश्नांपैकी 30 प्रश्न सोडविणे व प्रत्येक प्रश्नास दोन गुण असा पॅटर्न होता.त्यामध्ये बदल करुन 50 प्रश्नांपैकी 40 प्रश्न सोडविणे व प्रत्येक प्रश्नास दोन गुण असा पॅटर्न करण्यात यावा असा बदल सुचविला आहे. सदर बदलास मान्यता देण्याचा प्रस्ताव विद्वत परिषदेच्या निर्णयार्थ सादर<br>**विद्वत परिषद ठराव** – शैक्षणिक वर्ष 2021-22 मधील शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील शिक्षणक्रमांच्या परीक्षा बदललेल्या पॅटर्न प्रमाणे घेण्यात आलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | 60.3.13<br>सभा व दप्तर कक्ष | विद्वत परिषदेवर विद्यापीठ परिनियम क्रमांक 5/1992 See statute 8(a) of the Act मधील 3(viii) अन्वये Not less than 10 persons who are not employees of the University Co-opted/Nominated by Academic Council/Board of management for their special knowledge from the fields of Industries, trade and commerce, academic and professional organization, communication field, agriculture and agro-industries, services etc. यांच्या नामनिर्देशनाचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर...<br>**विद्वत परिषद ठराव** — विद्वत परिषदेवर विविध क्षेत्रातील तज्ञांचे नामनिर्देशनाचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आलेले आहेत. |
| 60.4.0 | | **ऐनवेळचे विषय** |
| | 60.4.1<br>विद्यार्थी सेवा विभाग | **सहयोग व विशेष उपक्रम केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमांना संबंधित विद्याशाखांमध्ये वर्ग करण्याबाबत प्रस्ताव विद्वत परिषदेच्या निर्णयार्थ सादर**<br><br>**विद्वत परिषद ठराव-** याबाबत सर्व विद्याशाखा संचालकांची एकत्रित बैठक आयोजित करण्यात यावी व शिक्षणक्रम संबंधीत विद्याशाखेमध्ये वर्ग करण्याची कार्यवाही करावी व याची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष 2023-24 पासून करावी असे ठरले. |
| | 60.4.2<br>कृषी विद्याशाखा | कृषी विद्याशाखेतील दिनांक 6 मे 2022 च्या विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त विद्वत परिषदेत मान्यतेसाठी सादर...<br>**टिपणी** - कृषी विद्याशाखेतील दिनांक 6 मे 2022 च्या विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त विद्वत परिषदेत मान्यतेसाठी सादर...<br>**विद्वत परिषद ठराव** — कृषी विद्याशाखा परिषदेच्या ठरावाची नोंद घेऊन, सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 60.4.3<br>संगणकशास्त्र विद्याशाखा | संगणकशास्त्र विद्याशाखेतील दिनांक 12 सप्टेंबर 2022 आणि 17 जानेवारी 2023 च्या विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त विद्वत परिषदेत मान्यतेसाठी सादर...<br>**टिपणी** - संगणकशास्त्र विद्याशाखेतील दिनांक 12 सप्टेंबर 2022 आणि 17 जानेवारी 2023 च्या विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त विद्वत परिषदेत मान्यतेसाठी सादर...<br>**विद्वत परिषद ठराव** - संगणकशास्त्र विद्याशाखा परिषदेच्या ठरावाची नोंद घेऊन, सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 60.4.4<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा | शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील एम.ए. — शिक्षणशास्त्र ह्या शिक्षणक्रमाच्या पुर्नरचित शिक्षणक्रमास मान्यता मिळणेबाबत....<br>**टिपणी** - NEP 2020 संदर्भात शासनाने निर्गमित केलेल्या आदेशानुसार एम.ए. — शिक्षणशास्त्र ह्या शिक्षणक्रमाचे पुर्नरचित शिक्षणक्रम संरचनेस मा. कुलगुरू महोदयांनी नियोजन मंडळाच्या वतीने मान्यता देण्यात आली असून सदर विषय विद्वत परिषदेसमोर विचारार्थ सादर....<br>**विद्वत परिषद ठराव** - शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील पुर्नरचित एम.ए. — शिक्षणशास्त्र या शिक्षणक्रमास सर्वानुमते मान्यता देण्यात आली |

| | | |
|---|---|---|
| | 60.4.5<br>सर्व<br>विद्याशाखा | NEP 2020 संदर्भात शिक्षणक्रमांसंदर्भात आलेल्या UGC/DEB/राज्य सरकार यांचेकडून जे मार्गदर्शक तत्वांबाबत...<br><br>**विद्वत परिषद ठराव** - NEP 2020 च्या अंमलबजावणीबाबत यापुढे UGC/DEB/राज्य सरकार यांचेकडून जे मार्गदर्शक तत्वे प्राप्त होतील त्याप्रमाणे संबंधित विद्याशाखेने कार्यवाही करावी असे ठरले. |

मा. कुलगुरू तथा अध्यक्ष विद्वत परिषद यांच्या परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सदस्य सचिव**
**विद्वत परिषद**

**अध्यक्ष**
**विद्वत परिषद**